## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## प्रकटन

**विषय :- जुलै–ऑगस्ट २०२४ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत (Hall Ticket)...**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेशी संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक आदींना सूचित करण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) जुलै–ऑगस्ट २०२४ परीक्षेसाठी सर्व विभागीय मंडळातील सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशपत्र (Hall Ticket) उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सर्व माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना जुलै–ऑगस्ट २०२४ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर गुरूवार, दिनांक ०४/०७/२०२४ पासून School/College login मध्ये download करण्याकरीता उपलब्ध होतील. या संदर्भात काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

ऑनलाईन प्रवेशपत्रे (Hall Ticket) उपलब्ध करून घेण्याच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की,

१. जुलै–ऑगस्ट २०२४ साठी सर्व विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी इ.१२ वी व इ. १०वी परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.

२. प्रवेशपत्र (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रिंटींग करताना विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापकांचा/प्राचार्यांचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावी.

३. प्रवेशपत्रामध्ये (Hall Ticket) विषय व माध्यम बदल असतील तर त्यांच्या दुरुस्त्या माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळात समक्ष जाऊन करून घ्यावयाच्या आहेत.

४. प्रवेशपत्रावरील (Hall Ticket) फोटो, स्वाक्षरी, विद्यार्थ्याचे नाव या संदर्भातील दुरुस्त्या माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर करुन त्यांची एक प्रत विभागीय मंडळाकडे त्वरीत पाठवावयाची आहे.

५. प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी पुन:श्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने व्दितीय प्रत (Duplicate) असा शेरा देऊन विद्यार्थ्यांस प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.

६. फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिक्का उमटवून स्वाक्षरी करावयाची आहे.

तरी जुलै–ऑगस्ट २०२४ मध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेसाठी प्रविष्ट झालेले सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(शैलेंद्र पाटील)
(प्र) सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.

दिनांक : ०२/०७/२०२४

क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/ 1088
दिनांक :- 03 JUL 2024

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा - सातारा/ सांगली / कोल्हापूर.

**विषय :- जुलै-ऑगस्ट २०२४ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत (Hall Ticket)...**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, जुलै-ऑगस्ट २०२४ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रांबाबत उपरोक्त प्रकटनानुसार कार्यवाही करावी. तसेच No Candidate केलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे संबंधित विद्यार्थ्यांना वितरीत करु नयेत.

विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रामध्ये विषय, माध्यम, विद्यार्थ्याचे नाव, आईचे नाव, वडीलांचे नाव, आडनाव अथवा इतर कोड यामध्ये दुरुस्ती असल्यास सोबतच्या प्रपत्र नमुन्याप्रमाणे दुरुस्ती प्रस्ताव प्रवेशपत्राच्या **दोन प्रतींसह** प्रती दुरुस्ती रु.२००/- शुल्क भरुन मंडळ कार्यालयास **समक्ष** सादर करावा, जेणेकरुन दुरुस्ती प्रक्रिया वेळेत होईल. प्रवेशपत्र दुरुस्ती परीक्षा सुरु होण्यापूर्वी करुन घेण्यात यावीत, अन्यथा विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस मुख्याध्यापक/ प्राचार्य यांची जबाबदारी राहील. सदर प्रस्ताव कोणत्याही परीस्थितीत टपालाव्दारे पाठवू नयेत.

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**सोबत** :- विहित नमुन्यातील दुरुस्ती तक्ता

# प्रवेशपत्रिकेतील / कनिष्ठ महाविद्यालय यादीतील चुकांच्या दुरुस्तीसाठी कळविण्याचे प्रपत्र

To be submitted before Examination

प्रपत्र परीक्षेपूर्वी दोन दिवसांपर्यंत समक्ष सादर करणे आवश्यक आहे.

क.महाविद्यालयाचा क्रमांक :- | J | | | | | | | |

## HSC Examination of Feb.-March /July-August______

Proforma indicating Errors in the Seat No. wise College List of Candidates

| Sr.No.<br>अ.क्र. | Application No.<br>आवेदनपत्र क्र. | Seat No.<br>बैठक क्र. | Name of Candidate<br>विद्यार्थ्याचे नाव | Original/Incorrect Position in the College List/ Hall Ticket<br>कनिष्ठ महाविद्यालय यादीतील/ प्रवेशपत्रिकावरील नोंद | Correct Position as per the College Record<br>क.महाविद्यालयाच्या अभिलेखाप्रमाणे आवश्यक दुरुस्ती |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(प्रपत्र इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे.)

प्राचार्य

____________

____________

स्थळ -

दिनांक -

# प्रवेशपत्रिकेतील / शाळा यादीतील चुकीच्या दुरुस्तीसाठी कळविण्याचे प्रपत्र

To be submitted before Examination

प्रपत्र परीक्षापूर्व दोन दिवसापर्यंत समक्ष सादर करणे आवश्यक आहे.

शाळा क्रमांक :

## S. S. C. Examination of March / October - 201

Proforma Indicating Errors In the Seat No. Wise School List of Candidates.

| No.<br>क्र. | Seat No.<br>बैठक क्रमांक | Name of the Candidate<br>विद्यार्थ्याचे नांव | Original Position in the School List<br>शाळा यादीतील नोंद | Correct position As per the School Record<br>शाळा दप्तराप्रमाणे आवश्यक दुरुस्ती | Application Form No.<br>आवेदनपत्र क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

प्रपत्र इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे.

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका

स्थळ :

दिनांक :